**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

विषय : विद्यापीठे अनुदान आयोगः भारतीय कृषि अनुसंधान परिषद योजना ( ६ वा वेतन आयोग) अनवये कृषि विद्यापीठे शासन अनुदानित महाविद्यालय व संलग्न महाविद्यालये या मधील शिक्षकवर्गीय व समकक्ष संवर्गातील वेतनश्रेणीची पुर्नरचना बाबत.

संदर्भ : १.शासन निर्णय क्र.संकीर्ण १५१७/प्र.क्र.४९७/६-अे, दि. २४ ऑगस्ट, २०१८
२.विद्यापीठ परिपत्रक क्र.बीबीए/युजीसी/वि.श्रे./२०१८, दिनांक १५/११/२०१८
३.सचिव, कृषि, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र. संकिर्ण १५१७/प्र.क्र.४९७/६-अे, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८
४. विद्यापीठ अधिसुचना क्र.बीबीए/युजीसी/वि.श्रे./२०१८/३०६७, दिनांक १८/१२/२०१८

## परिपत्रक

जा.क्र.अप्रवि/अधि.कार्या/ ४५१ /२०१८ दिनांकः२१ /१२/२०१८

प्रति,

सर्व आहरण व संवितरण अधिकारी
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला विभाग / नागपूर विभाग

उपरोक्त संदर्भाधिन अनु.क्र. १ वरील शासन निर्णयानुसार शासनाचे दि.२०/०९/२०१० चे शुध्दिप्रत्रक पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने संदर्भाधिन अनु.क्र.२ वरील परिपत्रकानुसार विद्यापीठातील आहरण व संवितरण अधिकारी यांना शासनाचे दि. २० सप्टेंबर, २०१० च्या शासन शुध्दिपत्रकामधील तरतुदींनुसार शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना लाभ दिले असल्यास त्याबाबतची माहिती विहीत विवरणपत्रात सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले. सचिव, कृषि, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भाधिन अनु.क्र.३ वरील अ.शा. पत्र क्र. संकिर्ण १५१७/प्र.क्र.४९७/६-अे, दि. २८ नोव्हेंबर,२०१८ नुसार कृषि विद्यापीठातील ६ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने विविध संवर्गातील वेतनश्रेणी पुनर्रचना करतांना अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करावयाच्या कालबध्द कार्यक्रम निश्चीत करुन दिला आहे. तसेच याबाबत विहीत कालावधीत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.सचिव यांना पाठविण्याबात कळविले आहे.

वरील प्रमाणे सर्व संबंधित कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती / वेतन निश्चिती पुनर्रचना केल्यानंतर संबंधितांना दि. २०/९/२०१० च्या शुध्दीपत्रानुसार प्रत्यक्ष प्रदान केलेली रक्कम , दि. २०/९/२०१० चे शुध्दीपत्रक रद्द केल्यामुळे प्रत्यक्ष देय असलेली रक्कम आणि अशाप्रकारे अतिप्रदान झालेल्या रकमेचे विवरणपत्र घेऊन दिनांक २९/१२/२०१८ रोजी अधिष्ठाता कार्यालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे सेवापुस्तकासह सादर करावे.

अधिष्ठाता
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

Scanned by CamScanner

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

अर्थ प्रशासन विभाग

पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)


जा.क्र.अप्रवि/अंदाज/९५६०/२०१८

दिनांकः २१/१२/२०१८

प्रति,

प्रभारी अधिकारी,
संगणक प्रणाली कक्ष
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**विषय :** शिक्षकवर्गीय व समकक्ष संवर्गातील वेतनश्रेणीची पुर्नरचना बाबत....

महोदय,

उपरोक्त विषयाच्या शिक्षकवर्गीय व समकक्ष संवर्गातील वेतनश्रेणीची पुर्नरचनाबाबतचे परिपत्रक सोबत जोडले असून, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात यावे, जेणे करुन सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना प्राप्त होईल.

**सहपत्र:**वरीलप्रमाणे

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला


आवक क्र. 156
दि. 24/12/2018
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला



Scanned by CamScanner